# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400001
दूरध्वनी - 22620601, 22690602 22641150/51, फॅक्स 26292102
E-mail :- desk12@gmail.com internet :- http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : 12/आस्था(2)/2016/मलोआ/28616
दिनांक : 8 DEC 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजीत परीक्षांकरीता शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत..
संदर्भ : मा. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. एमआयएस 0616/सीआर 51/2016/ तीन, दिनांक 2.11.2016

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे. त्वरित संदर्भासाठी पत्राची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्यावेळी उपकेंद्र निश्चीत करुन घेण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांची आवश्यक ती माहिती आयोगास विनाविलंब सादर करावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/MPSC/२०१६/ 3743
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 16 DEC 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

# प्रपत्र-१

District Centre :

| Sr. No.<br>(1) | Name, Full address, Tel. No. and email ID of the School / College<br>(2) | Floor<br>(3) | No of Class Rooms<br>(4) | No. of benches in each class rooms<br>(5) | No. of Candidates accommodated (Per Bench Per Candidate)<br>(6) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |

Dated :-

Signature of Authorized Signatory with Seal

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्र. एमआयएस-०६१६/सीआर-५१/२०१६/तीन

दिनांक : २ नोव्हेंबर, २०१६.

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई - ४०० ००१.

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मलोआ-१०१२/ प्र.क्र.९५/१२/आठ, दिनांक ११ मे,२०१२.
(२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण, क्रमांक संकीर्ण-१११९/ (प्र.क्र.९/१५)/समन्वय, दिनांक २८ जानेवारी,२०१५.

महोदय,

शासन सेवेतील विविध पदावर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पध्दतीने निवड करण्याकरीता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. संबंधित भरतीकरीता प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी वर्षभर शक्यतो सार्वजनिक सुटटीच्या दिवशी आयोगाच्या परीक्षांचे आयोजन केले जाते.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएससी-१००८/५९०/सीएस-१०९/आठ, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८२ नुसार राज्यातील खेडयापाडयामधील गरीब व होतकरु व्यक्तींना आयोगामार्फत आयोजित परीक्षांची संधी प्राप्त व्हावी, या हेतूने जिल्हा केंद्रावरील आयोगाच्या परीक्षांचे आयोजन संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले असून जिल्हा केंद्रावरील परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे. परीक्षेकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार शाळा/महाविद्यालयांचे अधिग्रहण करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकाद्वारे शासनाकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास आयोगाच्या कार्यालयाकडून परीक्षांकरीता उमेदवारांची अंदाजित संख्या जिल्हाधिकारी यांना कळवून जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाळा/महाविद्यालयांची नांवे उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येते. त्यानुसार, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एखाद्या परीक्षेच्या दिनांकास उपलब्धतेसंदर्भात शाळा/महाविद्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येतो. तसेच सदर दिनांकास उपलब्धतेसंदर्भात शाळा/महाविद्यालयांचे होकार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परीक्षेकरीता आयोगास शाळा/महाविद्यालयांची नांवे कळविण्यात येतात.

४. परीक्षेस प्रवेश देण्यात येणा-या उमेदवारांची संख्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निश्चित होते. त्यानंतर, परीक्षेच्या आयोजनासाठी उपलब्ध होणारा कालावधी अत्यंत अल्प असतो. प्रत्येक परीक्षेकरीता अर्ज करणा-या उमेदवारांची संख्या निश्चित नसल्यामुळे प्रत्येक परीक्षेच्यावेळी प्रवेश देण्यात येत असलेल्या उमेदवारांची संख्या वेगवेगळी आहे. प्रत्येक जिल्हा केंद्रावरील सर्व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची निश्चित संख्या आयोगाकडे उपलब्ध नाही. आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातीस अनुसरुन सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत असल्यामुळे व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती निश्चित नसल्यामुळे संगणकीय संस्करणासाठी तांत्रिक अडचणी उदभवत असल्याचे आणि त्याचा परिणाम परीक्षा आयोजनावर होत असल्याचेही